# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/10/2023 (बुधवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या इसमाविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ५०५०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन कळमेश्वरची कारवाई

दिनांक १०/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील स्टाफ कळमेश्वर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत मौजा कळमेश्वर येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक ट्रॅक्टर वाहनाने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा कळमेश्वर येथे नाकाबंदी करून स्वराज ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/सी. एच.— ७४१६ किंमती ५०००००/— रू. चालक नामे — दयाराम जिरू धुर्वे, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ०१ वरोडा हा आपल्या वाहनामध्ये विनारॉयल्टी १ ब्रास रेती किंमती ५०००/— रू. ट्रॅक्टरमध्ये भरून चोरटी वाहतूक करतांना मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून स्वराज ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/सी.एच— ७४१६ किंमती ५०००००/— रू. मध्ये विना रॉयल्टी १ ब्रास रेती किंमती ५०००/— रू. वरील ट्रॅक्टर व रेती असा एकुण ५,०५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोहवा/नावेद खान पोस्टे कळमेश्वर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अंकुश लाखे मो. नं ९९२३९६७६३० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर